एस. सी.सी. क्र. ६८४/२०१८

शासन – वि – विजय आडे

नि.क्र. **२२**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ ची साक्ष शपथेवर सुरु

मंगला रवी राठोड

वयः २८ वर्षे धंदाः मजुरी

रा. वसंतनगर, ता. केळापुर जि. यवतमाळ

**सर तपासणी सरकारी वकील ए.के. शाह यांचे मार्फतः–**

मी आरोपी विजय याला ओळखते कारण ते माझ्या गावातील रहीवासी आहे. आरोपी आणि माझे संबंध काहीच नाही. घटना दिनांक ०६/०५/२०१८ रोजीची दुपारी ३.०० वाजताची घटलना आहे. सदरच्या दिवसी मी माझ्या अंगनात पाणी भरत होते त्यावेळेस आरोपी विजय याने मला डोळा मारला व मला ईशारा केला की संडासला चाल व त्यानंतर तो मला खुप त्रास देते की, तो मला नेहमी माझ्या सोबत चाल म्हणते. कशासाठी चल म्हणते हे मला माहित नाही. तो मला माझ्या सोबत चाल आपण पळुन जाऊ असे म्हणते. ही घटना मी माझ्या पतीला माझ्या घरी हजर असलेली माझी ननंद यांना सांगितली. त्यानंतर मी सदर घटनेचा रिपोर्ट दिला. आता मला दिनांक ०६/०५/२०१८ रोजीचा जबानी रिपोट दाखविण्यात आला, त्यावर माझा अंगठा आहे, त्यातील मजकुर मला पोलिसांनी वाचुन दाखवीला तो खरा व बरोबर आहे, त्यास अंगठयापुरता **नि. क्र. २३** देण्यात येते. आता मला दिनांक ०६/०५/२०१८ एम.सी. आर दाखविण्यात आला, त्यावर माझा अंगठा आहे, त्यास **नि. क्र. २४** देण्यात येते. आरोपीला मला पळुन नेवुन माझ्या सोबत लग्न करण्याचा उद्देश होता. आरोपीची बायको त्याच्या जवळ आहे. दोन तिन वर्षापासुन मला आरोपीचा खुप त्रास आहे. मी रिपोर्ट दिल्यानंतर पोलिस ७ तारखेला आले होते व त्यांनी चौकशी केली व माझी विचारपुस केली. आरोपी विजय हा आज न्यायालयात हजर आहे.

**उलट तपास आरोपींन तर्फे ॲड.ए.बी. किनाके**

मी शिकलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी रिपोर्ट मध्ये काय लिहले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या पुर्वी आमच्या गावात ग्रामपंचायतीचे निवडनुक झाली. हे म्हणणे खरे आहे की, निवडनुक आली की आमच्या तांडयामध्ये दोन पार्टया असतात. हे मला माहित नाही की, सदर निवडनुकीमध्ये आरेपी विजय याचा भाऊ उमेदवार होता. हे मला माहित नाही की, आरोपीचा भाऊ आणि माझे पती हे वेगवेगळया पार्टीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरासमोरील नळ हे सार्वजनीक आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीचे घर दुर–दुर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरासमारे जगदंबा देवीचे मंदीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरासमोरील रोडवर तांडयामधील बायांचे येने जाने असते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला डोळा मारला नाही व मला चाल बसे म्हटले नाही. पोलिस माझ्या घरी आले होते व माझी विचारपुस केली होती तेव्हा मी पोलिसांना माझ्या बयानात आरोपी मला खुप त्रास देतो, पळुन जाऊ, त्याचा दोन–चार वर्षापासुन खुप त्रास आहे, असा संपुर्ण मजकुर सांगितला होता, परंतु तो माझ्या बयानात लिहला नाही व तो का लिहला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, असी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेर तपास काही नाही

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी
केळापूर
दिनांकः १३/०१/२०२०

माझे समक्ष

(जी. ओ. वानखडे)
२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी
केळापूर
दिनांकः १३/०१/२०२०